- **Aids Awareness  Programme - 01/12/2015 - Dr.Sonal Tayade. PHC Pahur**



**Aids - Causes and remedies : 16/08/2017 - Dr.Sonal Tayade. PHC Pahur**

दै तरुण भारत

ाव, गुरुवार १७ ऑगस्ट २०१७ ७

# गरुड महाविद्यालयात एड्स जनजागृतीवर कार्यशाळा

तभा वृत्तसेवा

शेंदुर्णी, ता. जामनेर, १६ ऑगस्टः अ.र.भा.गरुड कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास विभाग तसेच आयसीटीआर केंद्र पहूर यांच्या संयुक्त विद्यमाने रेड रिबन क्लबच्या माध्यमातून बुधवारी एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली.

पहूर आयसीटीसीच्या समुपदेशक डॉ. सोनल तायडे म्हणाल्या की, हात मिळविणे, चुंबन, अलिंगन, खोकला, शिंकणे, एक दुसऱ्याला वस्तू, शौचालयाचा वापर, डास, कीटक चावल्याने एचआयव्ही पसरत नाही. एचआयव्ही हा एड्स संसर्गित व्यक्तीसोबत असुरक्षित लैंगिक संबंध केल्याने एड्स संसर्गित गर्भवती मातेकडून तिच्या बाळाला, संसर्गित सुई/सिरींजचा वापर केल्यामुळे, संसर्ग बाधित रक्त दिल्याने, घेतल्याने पसरतो. यापासून बचाव करण्यासाठी संयम, एकनिष्ठता आणि जागरुक राहण्याची गरज आहे.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांची रक्तचाचणी करण्यात आली. 'एड्स जनजागृती'वर रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. नंतर पोस्टर दाखवण्यात आले.

प्राचार्य डॉ.वासुदेव पाटील यांनी अध्यक्षीय समारोप केला.

प्रास्ताविक रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी डॉ.आर डी.गवारे यांनी केले. आभा प्रा. सुजाता पाटील यां मानले. यशस्वीतेसाठी प्रा.व्ही एन.पतंगे, प्रा.पी.जे.सोनवणे प्रा.अप्पा महाजन, प्रा.एस जी.डेहरकर, प्रा. रिना पाटील प्रा.छाया पाटील, प्रा.डॉ. प्रश देशमुख, प्रा. दिनेश पाटी प्रा. वर्षा लोखंडे, प्रा.निक वानखेडे, प्रा. संदीप कुं प्रा. दीपक पाटील, अशोक तायडे, प्रतिभा परदे शिक्षकेतर कर्मचारीवृंद, विद्या विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.

**24/04/2014 – Red Ribbon Club Aids Awirness Programme  Dr.Seema Shinde**



रेड रिबन क्लब कार्यक्रमात व्याख्यान देतांना डॉ. सीमा शिंदे



रेड रिबन क्लब कार्यक्रमात बक्षीस वितरण



जनजागृती — गरूड महाविद्यालयात रा.से.यो.एककामार्फत रेड रिबन क्लबमध्ये डॉ.सिमा शिंदे यांनी केले मार्गदर्शन

# एड्सपासून बचाव करण्यासाठी जनजागृती हाच उपाय

वार्ताहर / २४ एप्रिल

**शेंदूर्णी ता.जामनेर :** येथील अ.र.भा. गरूड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात रा. से. यो. एककामार्फत रेड रिबन क्लबची स्थापना करण्यात आली. १५ विद्यार्थ्यांच्या या क्लबच्या माध्यमातून वर्षभर विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यावेळी डॉ. सिमा शिंदे यांनी 'एड्स आजारापासून बचाव करण्यासाठी जनजागृती हाच उपाय आहे ' असे आपल्या व्याख्यानातून प्रतिपादन केले.

शेंदूर्णी येथील महालक्ष्मी हॉस्पीटलच्या डॉ. सिमा शिंदे यांनी यावेळी 'एड्स : भयंकर रोग कारणे व उपाय' या विषयावर व्याख्यान दिले. त्यापुढे म्हणाल्या की एड्स हा एक महाभयंकर रोग असून त्यावर प्रतिबंध व जनजागृती करणे हाच उपाय आहे. सुरक्षित यौन संबंध तसेच संस्कारक्षम जीवन जगून आपण यावर मात करू शकतो. वेळोवेळी तपासण्या करणे गरजेचे आहे. हा रोग रक्ताच्या माध्यमातून पसरतो. याबाबतीत काळजी घेणे गरजेचे आहे. इंजेक्सन घेतेवेळी आपण स्वतःची नवीन सुई वापरली पाहिजे. तसेच सलूनमध्ये गेल्यानंतर ब्लेड सुध्दा नवे वापरले पाहिजे. कारण दुसऱ्याने वापरलेल्या या वस्तूतून संसर्ग होण्याचा मोठाच धोका असतो. अशा पध्दतीने समाजामध्ये या रोगाविषयी वेगवेगळ्या प्रकारची उपयुक्त अशी माहिती युवकांनी देवून प्रबोधन करणे गरजेचे आहे. ज्यांना एड्स असेल अशा रुग्णांकडून रक्ताचा संसर्ग सोडला तर फारसा धोका नसतो अशा रुग्णांना प्रेमाची गरज असते. त्यांच्याशी आपुलकीने व्यवहार करावा.

यानिमित्ताने एड्स या विषयावर पोस्टर्स व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. विजयी विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वासुदेव पाटील होते. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.आर.डी.गवारे यांनी तर सूत्रसंचालन प्लस टू चे रासेयोचे कार्यकारी अधिकारी प्रा. पी. जे. सोनवणे यांनी केले.

आभार महिला कार्यकारी अधिकारी प्रा. योगिता चौधरी यांनी मानले. याप्रसंगी प्रा. डॉ. एस.डब्ल्यू.मोळे, प्रा. अमर जावळे, उपप्राचार्य प्रा. आर.जी.पाटील, प्रा. डॉ. पी. एस. देशमुख, प्रा. एस. जी. डेहरकर, प्रा. अप्पा महाजन, प्रा. एन. बी. वानखेडे, प्रा. डी. एच. धारगावे तसेच शिक्षकेतर वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

**गरूड महाविद्यालयात एड्स जनजागृतीवर मार्गदर्शन करतांना डॉ.सिमा शिंदे, प्राचार्य डॉ. वासुदेव पाटील, प्रा. आर. डी. गवारे, प्रा. पी. जे. सोनवणे आदी** (छाया - अशोक जैन)

देशोन्नती मंगळवार, दि. २५ एप्रिल २०१७

**Aids Awareness Programme : 03/12/2018 : Dr.Sonal Tayade.PHC Pahur**

